# जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
## प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम
## दुरध्वनी क्रमांक ०७२५२ २३४५०८ फॅक्स नं. ०७२५२-२३२८५८
rdc_washim@rediffmail.com


---

क्र.कक्ष-५/जिना/कावि-२५४/२०१७ दिनांक -१३/११/२०१७

## ई-निविदा (दुसरी वेळ)

जिल्हाधिकारी कार्यालयातील कार्यालयीन कामकाजाकरीता झेरॉक्स ची आवश्यकता आहे.तरी सदरील कामाकरीता इच्छुक कंत्राटदार मान्यताप्राप्त संस्था यांनी कार्यालयीन कामकाजाकरीता लागणारे झेरॉक्स चे प्रति नग दर सादर करण्याकरीता या कामाचा पुरेसा अनुभव असलेल्या स्थानिक अभिकर्ते यांचे कडुन सदर बाबीकरीता विहीत नमुन्यातील ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर ई निविदेचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| निविदा फी | रु.1,100/- |
| ईसारा रक्कम (EMD) | रु. 5,500/- |
| सुरक्षा ठेव / अनामत रक्कम | रु.10000/- बॅक गॅरंटी |
| निविदा प्रसिध्द करणे | दिनांक 15/11/2017 |
| निविदाउपलब्ध कालावधी (कार्यालयीन वैळेत) | दिनांक 15/11/2017<br>दिनांक 22/11/2017 दुपारी 5.00 पर्यंत |
| प्रीबीड कॉन्फरंस घेणे (निविदा पुर्व बैठक) | दिनांक 20/11/2017 दुपारी 3.00 वाजता निवासीउपजिल्हाधिकारी जि.का. वाशिम यांचे दालनात |
| संपर्क अधिकारी | श्री आनंद देउळगावकर, अधिक्षक जि.का. वाशिम 07252 -232852 |
| निविदा अर्जाची किंमत व इसारा रक्कम ऑनलाईन भरणेचा कालावधी | दिनांक 15/11/2017 दुपारी 11.00 पासुन<br>दिनांक 22/11/2017 दुपारी 3.00 पर्यंत |
| निविदा अपलोड व प्रत्यक्षात सादर करणेचा अंतिम दिनांक | दिनांक 22/11/2017 दुपारी 3.00 वाजेपर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक 23/11/2017 दुपारी 3.00 वाजता |
| निविदा उघडणेचे ठिकाण | जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम |
| सदर ई निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. | |

स्वा/-
निवासी उपजिल्हाधिकारी
वाशिम

जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम
दुरध्वनी क्रमांक ०७२५२ २३४५०८ फॅक्स नं. ०७२५२-२३२८५८
rdc_washim@rediffmail.com

## अटी व शर्ती

1. वरील कामाची निविदा प्रक्रिया संगणकावर ई-निविदा प्रक्रियेव्दारे ऑनलाईन पाहता येईल. या निविदे संबंधी या पुढील सर्व सूचना / शुध्दीपत्रके इंटरनेटच्या उपयोगाने ऑनलाईन करण्यात येईल.
2. लिफाफा अ (तांत्रिक लिफाफा) मध्ये निविदा अर्जासह खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
   - निविदा अर्जाची रक्कम ऑनलाईन द्वारे भरणा करावयाचे आहे.
   - विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र टॅक्स नोंदणी दाखला, आयकर नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर प्रमाणपत्र, नादेय दाखला, तसेच सन 2015-2016 अखेरचे सेवाकर भरल्याचे विवरणपत्र व प्रमाणपत्र तसेच सन 2015-16 विक्रीकर नादेय प्रमाणपत्र तसेच जीएसटी रजिष्टेशन प्रमाणपत्र, पॅनकार्ड
   - झेरॉक्स कामाचा पुर्वानुभव तपशिल व प्रमाणपत्र
   - झेरॉक्स कामासाठी स्वत:ची यंत्रसामुग्री, मनुष्यबळ उपलब्ध असल्याचा तपशिल नमुद करणे आवश्यक आहे.
   - सन 2013-14, 2014-15, 2015-16 या आर्थीक वर्षाचे आयकर विवरणपत्र जोडणे आवश्यक आहे.
   - उपरोक्त बाबी मधील कागदपत्राच्या छायांकित प्रती स्कॅन करुन अपलोड करावी लागेल. याकरिता कोणताही अतिरिक्त कालावधीत अथवा मुदत वाढवून देण्यात येणार नाही.
   - निविधारकाचे फर्म ISO प्रमाणीत असल्यास प्राध्यान्य देण्यात येईल.
   - निविधा धारकारची संस्था कोणत्याही शासकीय काळया यादीत नसल्याचे प्रमाणपत्र
3. निविदेसोबत देण्यात आलेल्या BOQ-FILE मध्येच दर भरुन वेबसाईवर अपलोड करावे. सदरील दर हे मुल्यवर्धीक कर, आयकर, वाहतुक खर्च, व इत्यादी सह समाविष्ट असावेत.
4. लिफाफा क्रं. 01 (तांत्रिक लिफाफा) मध्ये कंत्राटदार अथवा सामाजीक संस्था यांचे व्यवसाय कर प्रमाणपत्र, नादेय दाखला, आयकर भरणा प्रमाणपत्र, सेवाकर नादेय प्रमाणपत्र, आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र, विक्रीकर / सर्व्हीस टॅक्स नोंदणी दाखला, आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्री / साहित्य यादी, उपलब्ध मनुष्यबळ / कर्मचारी यांदी यादी व दोन्ही डिमांड ड्राफ्ट यांच्या छायांकित प्रती स्कॅन करुन अपलोड करावी.तसेच कंत्राटदार अथवा संस्था काळया यादीत नसल्याचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.
5. लिफाफा क्रं. 2 (व्यवसायीक लिफाफा) BOQ-FILE मध्ये बाबीनिहाय दर भरावे.

   उपरोक्त बाबींच्या कागदपत्रांच्या छायाकिंत प्रत स्कॅन करुन अपलोड करावे लागेल. निविदेसोबत देण्यात आलेल्या बीओक्यु - फाईल मध्येच दर भरुन बेबसाईड वर अपलोड करावे. सदरील दर हे मुल्यवर्धित कर, आयकर, वाहतुक खर्च समाविष्ट असावे.
6. उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यात कोणतीही मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
7. कार्यालयाकरीता लागणारे झेरॉक्स मशीन साठी प्रशासकीय इमारती मध्ये ठेवण्यात आलेल्या जागेचे भाडे 2500/- रूपये प्रति महीना राहील सदरील भाडे हे प्रत्येक महीन्याला चलानद्वारे भरणे निवीदाकरास बंधनकारक राहील तसेच झेरॉक्स करीता प्रशासकीय इमारतीमध्ये वेगळे विद्युत मिटर घ्यावे लागेल.
8. कार्यालयीन झेरॉक्स चे दर सादर करतांना A4 पेपर झेरॉक्स दर, लिगर पेपर झेरॉक्स दर जंम्बो झेरॉक्स दर तसेच कलर कॉपी झेरॉक्स दर सादर करण्यात यावेत.
9. निविदेसाठीशासकीय कामाचा झेरॉक्स बाबत काम केल्याबाबतचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
10. वरील कामाची निविदा प्रक्रिया संगणाकावर ई-निविदा प्रक्रियेव्दारे ऑनलाईन पहाता येईल. या निविदे संबंधी या पुढील सर्व सूचना / शुध्दीपत्रके इंटरनेट च्या माध्यमाने ऑनलाईन करण्यात येईल.

# जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
## प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम
## दुरध्वनी क्रमांक ०७२५२ २३४५०८ फॅक्स नं. ०७२५२-२३२८५८
rdc_washim@rediffmail.com


11. ज्या ठेकेदाराला अथवा संस्थेस काम मंजुर करण्यात येईल त्यांना कामाचा आदेश देणेपुर्वी त्यांचेकडुन रक्कम रुपये 100/- रुपयाच्या बाँड पेपरवर अटी व शर्तीसह बंधपत्र लिहुन घेण्यात येईल. तसेच सुरक्षा अनामत रक्कम रुपये 10000/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा बँक गॅरंटी निवीदा मंजुर झाल्यापासुन15 दिवसाचे आत देणे आवश्यक आहे.
12. लिफाफा क्रं. 1 मध्ये कंत्राटदार यांचे सेवाकर प्रमाणपत्र / नादेय दाखला, विक्रीकर / सव्हीस टॅक्स नोंदणी दाखला,पॅनकार्ड व दोन्ही डिमांड ड्रॉफच्या मुळ प्रती **अधिक्षक जिल्हाधिकारी कार्यालय,वाशिम** यांचे नावे नझारत शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे समक्ष आणुन द्यावे लागेल किंवा टपालाव्दारे उपरोक्त मुदतीत पोहचतील या बेताने पाठविण्यात याव्यात.
13. यशस्वी निविदाधारकास जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम च्या प्रशासकीय इमारती मध्ये झेरॉक्स मशीन ठेवावी लागेल निविदा धारकाने निविदेत कोणतीही सूचना / अट समाविष्ट केल्यास ती निविदा अपात्र ठरविण्यात येईल.
14. आवशक्यतेनुसार झेरॉक्स मशीन वाढविणे कमी करणे इत्यादी बाबी जिल्हाधिकारी वाशिम, निवासी उपजिल्हाधिकारी वाशिम यांचे अधिकार राहतील व ते अंतीम राहतील.
15. कार्यालयात दैनंदीन काढण्यात आलेल्या झेरॉक्स ची गणणा करण्यात येवुन नझारत शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे अहवाल देणे बंधनकारक आहे
16. कार्यालयाकरीता काढण्यात आलेल्या झेरॉक्स चे देयके महिना संपताच 5 तारखेच्या आत सादर करणे आवश्यक राहील. देयका बरोबर कार्यालयाची कर्मचारी यांनी काढलेल्या झेरॉक्स ची स्वाक्षरीसह संख्या ठेवण्यात आलेली नोंदवही देणे बंधनकारक राहील.
17. निविदा धारक स्वत त्यांची संस्था अथवा त्यांनी नियुक्त केलेले कर्मचारी हे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधीत असता कामा नये. तसेच राजकीय पक्षाचा ज्ञात सहानुभूती कर्ता किंवा राजकीय पुढाऱ्यांचा हितसंबंधी असता कामा नये. तसेच त्यांचे विरुध्द कोणताही फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल / प्रलंबीत असता कामा नये.
18. निविदाधारकाच्या देयकातून नियमानुसार आयकर व त्यावरील अतिरिक्त कर कपात करण्यात येईल. ठेकेदारास अथवा संस्थेस कोणत्याही प्रकारचे अग्रिम देण्यात येणार नाही.
19. निविदाधारकाचे काम निविदा मंजूर झाल्यानंतर निविदेतील मंजूर दर एका वर्षाकरिता असुन आदेश एक वर्षापर्यंत कायम राहील. काम समाधानकार असल्यास एक वर्षाकरिता मुदत वाढवुन देण्यात येईल.
20. निविदा धारकाने प्रति झेरॉक्स दर नमुद करतांना त्यामध्ये कामासाठी येणारा सर्व खर्च व भरावे लागणारे वेगवेगळे कर इत्यादी बाबी विचारात घेऊन दर नमुद करावा. यशस्वी निविदा धरकास या कार्यालयाकडून कोणतीही शासकीय / निमशासकीय कराची रक्कम देण्यात येणार नाही आणि त्याबाबतच्या माफीचे कोणतेही प्रमाणपत्र देय असणार नाही. तसेच नियमानुसार आयकर व लागू असणारे इतर कर वजा करुन देयक अदा करण्यात येईल.
21. वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तीमधील संपुर्ण अथवा कोणत्याही भागाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत ठेकेदारा विरुध्द निवडणूक नियमा नुसार भारतीय दंडसंहिता मधील उचीत कलमानुसार कारवाई करण्यात येईल.
22. त्याचप्रमाणे अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निर्देशासनास आल्यास अनामत रक्कम अंशतः अथवा पुर्ण जप्त करणेची कार्यवाही केली जाईल.
23. या कार्यालया मार्फत देण्यात येणाऱ्या सूचना तसेच वेळोवेळी जे निर्देश दिले जातील त्याचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
24. सदर निविदेसंदर्भात कोणताही न्यायालीयीन वाद जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात चालविला जाईल.

25. सदरची निविदा अगर निविदेतील कोणतीही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्तीमध्ये कोणतीही पुर्व सूचना न देता रद्द करणेचा / राखुन ठेवणेचा तसेच सुधारणा करणेचा तसेच कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उदभवल्यास, तसेच निविदा मंजूर करणे अगर निविदा नाकारणे, तसेच आवश्यक्ता वाटल्यास विभागुन देणे, शर्ती बदलणे करणे, शर्ती शिथिल बाबतचे संपुर्ण अधिकार / हक्क जिल्हाधिकारी वाशिम, जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी राखुन ठेवले आहेत. व त्यासंबंधी जिल्हाधिकारी वाशिम यांचे आदेश अंतीम राहतील

स्वा/-
निवासी उपजिल्हाधिकारी
वाशिम